आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

बुधवार दिनांक ९ एप्रिल २०२५

ठळक बातम्या

1. भारतीय रिझर्व्ह बँकेचं चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतलं पतधोरण जाहीर, रेपो दरात पाव टक्के कपात.
2. नागपुरातील वैशालीनगर जवळील मेहंदीबाग रोडवरील फटाका गोडाऊनला आग, मोठ्या प्रमाणात नुकसानीची नोंद.
3. अमरावतीहून १६ एप्रिलला मुंबईसाठी पहिले विमान उड्डाण.
4. आज नागपुरात अवकाळी पावसाची हजेरी,नागपूरसह विदर्भाच्या अनेक जिल्ह्यात उद्या देखील वादळी पर्जन्यमानाची शक्यता.

----------------------------------------

रिझर्व्ह बँक

भारतीय रिझर्व्ह बँकेचं चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतलं पतधोरण आज जाहीर झालं. बँकेच्या पतधोरण समितीनं रेपो दरात पाव टक्के कपात करून तो ६ टक्क्यांवर आणला आहे. यामुळे Standing Deposit Facility अर्थात स्थायी ठेव सुविधा दर पावणेसहा टक्के, तर Marginal Standing Facility अर्थात सीमांत स्थायी सुविधा दर आणि बँक दर सव्वासहा टक्के इतका राहील. पतधोरण समितीनं २०२५-२६ साठीचा सकल देशांतर्गत उत्पादनासाठीचा अंदाजित दर सहा पूर्णांक ७ दशांश टक्क्यांवरून साडेसहा टक्क्यांपर्यंत खाली आणल्याची माहितीही रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी दिली आहे. या वर्षात देशाचा किरकोळ महागाई दर ४ टक्के राहण्याचा अंदाज असल्याचंही मल्होत्रा यांनी सांगितलं.जागतिक अर्थव्यवस्थेसाठी या आर्थिक वर्षाची सुरुवात अस्वस्थतेत झाली असून त्यातल्या अस्थिरतेबाबत रिझर्व्ह बँक सावधपणे लक्ष ठेवून असल्याचं गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी अधोरेखित केलं.

----------------------------------------

वेव्ह्ज परिषद

मनोरंजन उद्योग मोठ्या उद्योगांपैकी एक असून, आगामी काळात याचा मोठा विस्तार होणार असल्याचं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. एका खाजगी वृत्तसंस्थेनं आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते काल बोलत होते. सरकारने पुढील महिन्यात मुंबईत वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल आणि एंटरटेनमेंट म्हणजेच

वेव्ह्ज परिषदेचं आयोजन केलं आहे. या परिषदेमुळे भारतीय कलाकारांना कंटेट तयार करण्यासाठी आणि आपली कला जागतिक पातळीवर पोहचवण्यासाठी उपयोग होणार असल्याचं पंतप्रधान म्हणाले,

*(हमने क्रिएट इन इंडिया का मंत्र लेकर इसे नेक्स्ट लेवल पर ले जाने का फैसला लिया है। वेव्स इंडियन आर्टिस्ट को कंटेन बनाने और ग्लोबल बनाने के लिए एनकरेज करेगा और इसके साथ साथ क्रिएट इन इंडिया दुनिया भर के आर्टिस्ट को भारत में आने का अवसर भी देगा।)*

-----------------------------------------

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव

आधार ॲप द्वारे चेहरा ओळख प्रमाणिकरण करता येईल यासाठी कोणतेही प्रत्यक्ष कार्ड किंवा छायांकित प्रत आवश्यक नसल्याचं केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. आता फक्त एका टॅप न वापर करते केवळ आवश्यक माहिती सामायिक करू शकतात असं त्यांनी सांगितलं आधार पडताळणी अगदी यूपीआय द्वारे पेमेंट करणे इतकं सोपं झालं आहे. वापरकर्ते त्यांची गोपनीयता सुनिश्चित करून डिजिटल पद्धतीने पडताळू शकतात आणि सामायिक करू शकतात.

*(आइडेंटिटी ऑथेंटिकेशन को हम किस तरह से कंप्लीट्ली ऑनलाइन मोड में ले के जा सके इसके पीछे एक कारण है। आपने देखा होगा खबरें आती हैं कि आधार कार्ड फोर्जिंग करके किया गया इस प्रॉब्लम को टैकल करने के लिए एक टू स्टेप प्रोग्राम बना।)*

केवळ क्यूआर कोड स्कॅन करून एक विनंती पाठवायची आहे. त्यामुळे आधारची छायांकित प्रत सगळीकडे नेण्याची गरज नाही. आधारचे हे नवीन ॲप सुरक्षित असून त्याद्वारे माहिती वापरकर्त्यांच्या संमतीने सामायिक करता येते असे ते म्हणाल. यामुळे आधार कार्ड मधील माहितीचा गैरवापर देखील होणार नाही असे त्यांनी सांगितलं.

-----------------------------------------

आग

नागपुरातील वैशालीनगर जवळील मेहंदीबाग रोडवरील फटाका गोडाऊनला आज आग लागली. यात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या जवानांच्या वतीने आगीवर नियंत्रण मिळविणे सुरू असून सहा ते सात गाड्या घटनास्थळी दाखल झालेल्या आहेत. या दरम्यान फटाके

देखील फुटत असल्याने जोखीम आहे.  आग कशामुळे लागली हे अध्याप कळू शकले नाही.

-----------------------------------------

अमरावती  विमानतळ

गेल्या अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या अमरावतीच्या विमानतळाचे काम आता पूर्ण झाले असून अमरावती विमानतळावरून पहिले विमान उड्डाण करण्यासाठीची तारीख आता निश्चित झाली आहे.अमरावती विमानतळावरून मुंबईसाठीचे पहिले विमान १६ एप्रिलला टेकऑफ करणार असून यासाठीचे सर्व तिकीट बुकिंग फुल्ल झाली आहे. यामुळे अखेर अनेक वर्षांची प्रतीक्षा आता संपली आहे.याठिकाणी अलायन्स एअर लाइनवर विमान प्रवासाची जबाबदारी आहे. तारीख निश्चित झाल्यानंतर काही वेळातच अमरावती- मुंबईची तिकिट बुकिंग फुल्ल झाली आहे.मुंबईसाठी टेकऑफ होण्यापूर्वी १६ तारखेलाच अमरावती विमानतळाचा लोकार्पण सोहळा होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, चंद्रशेखर बावनकुळे हे लोकार्पण करणार असून अमरावती- मुंबई पहिल्या विमानाने प्रवास करणार आहेत.

-----------------------------------------

गणेश नाईक (वनमंत्री)

राज्यातील 65 टक्के वन विदर्भात असून आणि वनविभागाचे बहुतांशी कार्यालय ही विदर्भात नागपुरात आहे.त्यामुळे अधिकाऱ्यांशी बैठक घेऊन सूचना देण्यासाठी आज आणि उद्या वनविभागाच्या महत्त्वाच्या बैठकांचे आयोजन वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून यात विविध विषयांवर उहापोह होणार आहे.

*(त्याच्यामध्ये प्रामुख्याने वाघ आणि माणूस यांच्या मध्ये चालू असलेला संघर्ष वाघांचे मानवावर हल्ले मानवाने वाघांची केलेली शिकार वाघ आपसामध्ये झुंज घेऊन जखमी होतात. या सर्व बाबींचा ऐकून  विचार करता निश्चितपणे हा संघर्ष कमी व्हायला पाहिजे. त्या करता उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने निश्चितपणे आदान प्रदान विचारत होणार आहे.)*

याशिवाय वन जमिनीवर अतिक्रमण, वन विभागाला आवशयक असलेला निधी इत्यादी देखील विषय विचाराधीन असणार आहे.

-----------------------------------------

हवामान

नागपूरसह विदर्भातल्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये उद्या वादळी वाऱ्यासह तुरळक ठिकाणी पावसाच्या हलक्या सरी वर्षाव करू शकतात. नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, अमरावती, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये उद्या वादळी पर्जन्यमानाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर चंद्रपूर, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम या जिल्ह्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी पर्जन्यमान राहू शकत असा इशारा नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने दिला आहे. तत्पूर्वी आज दुपारी 4 च्या सुमारास नागपूर, भंडारा इथं काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळआणि हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. याशिवाय विदर्भातील वर्धा, अमरावती, गोंदिया, वाशीम, यवतमाळ, गडचिरोली जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि खूप हलका ते हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.दरम्यान आज अकोल्यात ४४. अंश सेल्सियस इतके कमाल तापमान नोंदविण्यात आलं. नागपुरात आज तापमानात किंचित घाट झाली असून कमल तापमान ४० पूर्णांक २ अंश सेल्सियस इतकं आहे

-----------------------------------------

संविधान चौकात पोलिस बंदोबस्त

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पूर्वसंध्येला संविधान चौकात पोलिस बंदोबस्त ठेवण्यात यावा, अशा आशयाचे निवेदन प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी चे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांनी पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र कुमार सिंगल यांना दिले. पोलिस आयुक्त कार्यालयात भेट घेवून त्यांच्याशी या संदर्भात चर्चा केली. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती नागपूर शहरात 14 एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. संविधान चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यासाठी बौद्ध बांधवांसह विविध सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय संघटनांची उपस्थिती असते. जयंतीच्या पूर्वसंध्येला म्हणजे 13 एप्रिलला सायंकाळी शहरातील विविध भागांतून निघणाऱ्या मिरवणुका, रॅली वाजतगाजत मध्यरात्रीच्या सुमारास संविधान चौकात पोहोचतात. या रॅलींमध्ये हजारोंचा जनसमुदाय असतो. बाराच्या ठोक्याला केक कापून आनंद साजरा केला जातो. अनुयायांची पहाटेपर्यंत गर्दी असते. कुठलाही अनुचित प्रकार टाळण्यासाठी 13 एप्रिलच्या रात्री संविधान चौकात पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात यावा,अशा आशयाचे निवेदन ससाई यांनी दिले.

-----------------------------------------